# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०७/२०२२ (गरूवार)**

**(सायंकाळ)**

---

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत २१ कि.मी अंतरावरील मौजा श्रीकृष्ण नगर बुटीबोरी प्रकाश नागपुरे यांच्या घरी येथे दिनांक ०६/०७/२०२२ चे १२:०० वा. पुर्वी **मनोहर भिमराव पुंडकर(मृतक), वय ६५ वर्ष, रा. वरूड गुर्जर ता. दर्यापुर जि. अमरावती** यांना पायाला त्रास होता. त्यामुळे सदर त्रासाला कंटाळुन त्यांनी छताच्या हुकला लोखंडी कडी व त्याला नॉयलान दोर बांधुन गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संदीप मनोहर पुंडकर, वय ३८ वर्ष, रा. व्यंकेटेश सिटी बुटीबोरी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार खंडारे मो.क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत मौजा बुटीबोरी शिक्षक कॉलनी येथे दिनांक ०१/०७/२०२२ चे १९.३० वा. सुमारास **आषिश पांडुरंग हिवसे (मृतक), वय ४० वर्ष, रा. नवीन वस्ती शिक्षक कॉलनी बुटीबोरी** यांनी अज्ञात कारणातुन त्यांचे राहते घरी विषारी किटकनाशक औषध प्राशन केले. या अपघातात त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम माया हॉस्पीटल बोरी व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता दि. ०२/०७/२२ चे १०.०० वा. भरती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी दि. ०६/०७/२०२२ वा. ०१.४५ वा. तपासुन मृत घोशीत केले. सदरचा कागदपत्र प्राप्त झाल्यावर मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार शैलेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार खंडारे मो.क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

### नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा कोंढासावळी शिवार येथे दिनांक ०६/०७/२०२२ चे १३.०० वा. ते १३.३० वा. सुमारास **उमेश भिमराव ढोंगे (मृतक), वय ३२ वर्ष, रा. कोंढासावळी** हे शेतात कामास गेले होते. परंतु पाउस सुरू असल्याने ते बाजुलाच असलेल्या धनराज ढोरे यांचे शेतातील झोपडीत लपण्यास गेले असता त्या झोपडीत आधिच धनराज ढोरे व त्यांचा मुलगा राकेश ढोरे बसुन असल्याने तिघेही झोपडीत बसले असता अचानक विज पडल्याने उमेश ढोंगे हे बेशुध्द पडले. त्यांना नवेगाव खैरी पी.एच.सी. येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. तसेच राकेश ढोरे यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकामी ग्रामीण रूग्णालय पारशिवनी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शुभम अरूण ढोंगे, वय २७ वर्ष, रा. कोंढासावळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार श्री गंगाप्रसाद वरखडे मो.क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर